!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४२६ ०८/०१/१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## मराठवाड्याच्या रेल्वे प्रश्नावर खासदार आक्रमक

**नांदेड, दि.८** रेल्वे अर्थसंकल्पाच्या पार्श्वभुमीवर नांदेड रेल्वे डिव्हीजन अंतर्गत खासदारांच्या बैठकित आज चारही खासदारांनी मराठवाड्याच्या प्रश्नावर आक्रमक होवून कुठल्याही परिस्थितीत नांदेड डिव्हीजन मध्य रेल्वेला जोडण्याचा प्रस्ताव सकारात्मक अहवालासह रेल्वे बोर्डाला पाठवा. त्याचप्रमाणे मराठवाड्यातील प्रलंबीत मागण्या पुर्ण करण्यासंदर्भात व जादा रेल्वे गाड्या मंजुर करण्यासंदर्भात ठोस भुमीका घ्या अशी भुमीका घेतली. शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी मराठवाड्याचे सर्व प्रश्न सविस्तर मांडून अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणाबद्दल व चुकीच्या प्रस्तावाबद्दल नाराजी व्यक्त करून मराठवाड्याचे प्रश्न कुठल्याही परिस्थितीत मार्गी लावा अशा कडक शब्दात अधिकाऱ्यांना बजावले.

नांदेड रेल्वे डिव्हीजनच्या सभागृहात आज नांदेड रेल्वे डिव्हीजन अंतर्गत येणाऱ्या खासदारांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकिला दक्षिण मध्य रेल्वेचे महाप्रबंधक रविंद्र गुप्ता, नांदेडचे विभागीय व्यवस्थापक अश्विनकुमार सिन्हा, शिवसेनेचे संसदेतील प्रतोद खासदार चंद्रकांत खैरे, परभणीचे खासदार संजय जाधव, नांदेडचे खासदार अशोक चव्हाण व हिंगोलीचे खासदार राजीव सातव यांची यावेळी उपस्थितीत होती.

सुरूवातीलाच खासदार खैरे व अशोक चव्हाण यांनी बैठकितील मागण्यासंदर्भात अधिकारी सकारात्मक असतील तरच बोलण्याला अर्थ आहे. चुकीची माहिती देवून वरिष्ठांना व रेल्वे बोर्डाला मराठवाड्याच्या मागण्यासंदर्भात उपेक्षित ठेवण्याचा प्रकार यापुढे सहन केला जाणार नाही, अशी भुमीका मांडली. खा. खैरे यांनी मुदखेड धर्माबादसह मराठवाड्याचा सर्वभाग मध्य रेल्वेला जोडण्यासंदर्भातला प्रस्ताव मांडला. त्याला सर्व खासदारांनी पाठींबा देवून याबाबत अधिकाऱ्यांनी सकारात्मक भुमीका घ्यावी अशी जोरदार मागणी केली. खा. अशोक चव्हाण यांनी नांदेड-पुणे गाडीच्या संदर्भात वगेवगळ्या वेळी निवेदन देवूनसुध्दा दोन डिव्हीजनमधील मतभेद व गाड्यांचे अंतर याबाबत का निर्णय होत नाही. गाडी उशीरा का जाते, याबाबत सवाल करून ट्रॅव्हल चालकाचे व रेल्वेचे काही साटेलोटे आहे काय असा सवाल उपस्थित केला. येत्या अधिवेशनापर्यंत रेल्वेचे पुणे गाडीचे वेळापत्रक सुरळीत न झाल्यास येत्या अधिवेशनात या अंतर्गत साटेलोटे प्रकरणाची सीबीआय चौकशीची मागणी करू, असे ठासून सांगीतले. खा. जाधव, खा. सातव यांनीही त्याला पाठींबा दिला.

संभाजीनगरचे रेल्वेस्थानक अद्यावत करण्यासंदर्भात, त्याचप्रमाणे अतिरिक्त जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भात वारंवार पाठपुरावा केला जातो. दोन जोड पुलांचा रस्ता तसेच बाजुची वस्ती विकसीत करण्याचा व रेल्वेने ती ताब्यात घेण्याचा प्रश्न प्रलंबीत आहे. यावर अधिकाऱ्यांनी निधी कमी असल्याचे सांगुन वेळ मारून नेली. त्यावर बाहेरून यासाठी खासगी कर्जरोखे किंवा अन्य कर्ज उपलब्ध करून एकदाचे हे काम मार्गी लावा. आपली उदासीनता यासाठी कारणीभूत असल्याचा आरोप त्यांनी केला. अतिरिक्त रेल्वे गाड्या, रेल्वे मार्गाचे रूंदीकरण, रेल्वेतील स्वच्छता तसेच रेल्वेस्थानकावरील सोई संदर्भात याबैठकीत सविस्तर चर्चा झाली.

## पत्रकार परिषद

**नांदेड, दि.८** नांदेड रेल्वे डिव्हीजन मध्य रेल्वेला जोडण्यासंदर्भात तसेच नांदेड-पुणे रेल्वे गाडीचे वेळापत्रक सुरळीत करण्यासंदर्भात, त्याचप्रमाणे मुदखेड ते मनमाड या रेल्वेमार्गाचे दुपदरीकरण करण्याच्या कामावर लक्ष केंद्रीत करण्याच्या सुचना आपण दिल्या असल्याचे खा. चंद्रकांत खैरे व खा. संजय जाधव यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत बोलतांना सांगीतले.

रेल्वे प्रश्नाच्या संदर्भात आज नांदेड रेल्वे डिव्हीजन येथे खासदारांची बैठक आयोजित करण्यात आली होती. खैरे व जाधव यांनी पत्रकारांना संबोधीत केले. मराठवाड्याच्या रेल्वेचा प्रश्न हा गंभीर बनत चालला असून रेल्वेच्या प्रश्नावर सिकंद्राबादमध्ये बसलेल्या अधिकाऱ्यांना मराठवाड्याच्या प्रश्नावर कांहीच देणे घेणे नाही असा आरोप खैरे यांनी केला. नांदेड डिव्हीजन मध्य रेल्वेला जोडण्यासंदर्भात गेल्या वर्षापासून मागणी होत असतांनाच त्याबाबत अधिकारी वरिष्ठांना चुकीची माहिती देतात. त्यामुळे या बैठकित आम्ही संबंधीतांना योग्य त्या सुचना दिल्या आहेत. येणाऱ्या अधिवेशनात आम्ही ही मागणी पुर्ण करूनच घेवू असा विश्वास व्यक्त केला. नांदेड ते पुणे रेल्वे गाडीचा प्रश्न व त्याचे वेळापत्रक यासंदर्भात दोन झोनमध्ये असलेले मतभेद व ट्रॅव्हल्स चालकांचे साटेलोटे हा प्रकार गंभीर असून वारंवार कुठल्याही स्थानकावर गाडी ताटकळत ठेवणे व या प्रवासाला १३ तास लावणे यातील गौडबंगाल शोधले पाहिजे. गाडीचे वेळापत्रक न बदल्यास या साटेलोटे प्रकरणाची सीबीआय चौकशीची मागणी आम्ही चारही खासदारांनी केली असल्याची खैरे व जाधव यांनी सांगीतले.

खा. संजय जाधव यांनी एकेकाळी पुर्णा जंक्शन हे महत्वाचे स्थानक होते मात्र रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी या जंक्शनचा कबाडा वाजविल्याचा आरोप केला. पुर्णामधील डिझेल फोमशेड निर्माण करण्याच्या कामाला गती देण्यात यावी. त्याच प्रमाणे केवळ मुदखेड ते परभणी या रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण करून न थांबता लगेच परभणी ते मनमाड या रेल्वे मार्गाचे लगेच सर्वेक्षण करून याही कामाला तातडीने गती देण्यासंदर्भात आम्ही पाठपुरावा करणार आहोत. वेगवेगळे लोको शेड व पुर्ण्यांची वेगवेगळी कार्यालय आंध्रप्रदेशात स्थलांतरीत केली जात आहेत. याबाबत संताप व्यक्त करून खा. जाधव यांनी हे थांबविण्यात यावे अशी मागणी केली असल्याचे सांगीतले. पुर्णा स्टेशन हे सिकंद्राबाद-पुर्णा, अकोला-पुर्णा या मार्गाला कार्ड लाईनने जोडून मुळ स्टेशनला बायपास करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. त्यावर पुनर्विचारकरून सदरचा निर्णय रद्द करावा, अशी मागणी ही आपण केल्याचे सांगीतले. लातूर-मुंबई ही गाडी नांदेडपर्यंत वाढविण्याच्या प्रश्नासंदर्भात देखिल आजच्या बैठकित विचार झाला. त्याचीही अमलबजावणी लवकर करण्याची त्यांनी सांगीतले. धर्माबाद आणि मुदखेड या मार्गावरील रेल्वेस्टेशनसह नांदेड डिव्हीजन मध्य रेल्वेला जोडण्याच्या महत्वपुर्ण मागणीला आज सर्वच खासदारांनी पाठींबा देवून या मागणीवर लक्ष केंद्रीत करण्याचे ठरविण्यात आल्याचे जाधव यांनी सांगीतले.

**प्रसिध्दी प्रमुख**
**योगेश पायघन/ गणेश वाघ.**

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525